सातारा न्यूज

निर्भीड व निष्पक्ष बातमी देणारं एकमेव व्यासपीठ

http://esataranews.com sataranewsonline @SataraNews sataranews


# क्विक हील फाउंडेशन, पुणे येथे कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, वर्ये, सातारा येथील सायबर वॉरियर्स क्लबची अधिकृत स्थापना

सातारा न्यूज;

पुणे: क्विक हील फाउंडेशन, पुणे यांच्या सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या राष्ट्रीय जनजागृती अभियानांतर्गत कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, वर्ये, सातारा येथील सायबर वॉरियर्स क्लबची अधिकृत स्थापना उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. या प्रसंगी क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. अनुपमा काटकर यांच्या हस्ते सायबर वॉरियर्स क्लबची अधिकृत स्थापना करण्यात आली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी समाजामध्ये सायबर सुरक्षिततेबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, प्रत्येक नागरिकामध्ये सुरक्षित डिजिटल व्यवहारांची जाणीव निर्माण करावी तसेच सुरक्षित आणि सक्षम डिजिटल भारताच्या उभारणीत आपले योगदान द्यावे, असे आवाहन केले. कार्यक्रमास क्विक हील फाउंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अजय शिर्के, तसेच श्री. दीपू




सिंग आणि सौ. गायत्री केसकर उपस्थित होते. त्यांनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या राष्ट्रीय अभियानाची उद्दिष्टे, त्याची आवश्यकता तसेच सायबर वॉरियर्स क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी समाजामध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती कशी करावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या उपक्रमांतर्गत ओमकार कदम यांची अध्यक्ष, पुजा शिंदे यांची सचिव, धनराज तपासे यांची मीडिया डायरेक्टर आणि दिया सकुंडे यांची क्टिव्हिटी डायरेक्टर म्हणून सायबर वॉरियर्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांपदी अधिकृत नियुक्ती करण्यात आली. या पदाधिकाऱ्यांवर महाविद्यालयामध्ये सायबर जनजागृती अभियान, कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम, विद्यार्थी सहभाग उपक्रम तसेच सामाजिक माध्यमांच्या माध्यमातून डिजिटल सुरक्षेबाबत जनजागृती राबविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या उपक्रमासाठी क्विक हील फाउंडेशनचे समन्वयक प्रा. मंथन जे. पंडित हे शिक्षक समन्वयक म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. डी. कुंभार आणि संस्थेचे संचालक डॉ. बी. एस. सावंत यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभणार आहे. सायबर वॉरियर्स क्लबच्या स्थापनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संवादकौशल्य, डिजिटल साक्षरता आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना विकसित होण्यास चालना मिळणार आहे. तसेच शाळा, महाविद्यालये आणि समाजामध्ये सायबर सुरक्षेबाबत प्रभावी जनजागृती करून सुरक्षित डिजिटल समाजाच्या निर्मितीसाठी हा क्लब महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास संस्थेच्या प्रशासनाने व्यक्त केला.